ISSN 2395-3748 | UGC APPROVED JOURNAL NO 64191
RNI REGISTRATION NO MAHMUL/2014/57148

# BULLETIN OF INDIAN SOCIETY AND CULTURE


A Peer-Reviewed Inter-Disciplinary International Research Journal

Vol 5 | Issue 2 | Feb 2018

## समकालीन हिंदी पद्य साहित्य विवेचन

SPECIAL ISSUE

संपादक
प्रा. क्षीर[illegible] पी. बी | डॉ. सोळंके सी. एन.



समकालीन आदिवासी साहित्य
प्रा. नागनाथ बनसोडे
६८ – ७५

शेतकऱ्याच्या तोलाच्या जगण्याचा हृदयस्पर्शी आविष्कार म्हणजे 'असं जगणं तोलाचं' ही प्रादेशिक कादंबरी
डॉ. विजयकुमार शिवदास ढोले
७६ – ८३

पश्चिम खानदेशातील अदिवासी (भिल्लांची) लोकगीते
प्रा. डॉ. एम.बी. धोंडगे आणि प्रा. आर.एम. आहिरे
८४ – ९०

समकालीन साहित्य, संज्ञा व स्वरुप
प्रा. डॉ. चंद्रसेन एस. आवारे
९१ –९५

समकालीन मराठी ग्रामीण साहित्य
प्रा. डॉ. सहदेव विलासराव रसाळ
९६ – १०१

ऊसतोड कामगार बनण्याची कारण मिमांसा
डॉ. श्रीम. गित्ते कविता नरसिंगराव
१०२ – १०७

मराठी रंगभूमीची स्थिती
हनुमंत बिरुदेव सौदागर
१०८ – ११२

जागतिकीकरणानंतरची समकालीन स्त्रीवादी साहित्याची चळवळ
प्रा.डॉ. गोविंद रामदिनेवार
११३ – ११९

आदिवासी साहित्याची वाटचाल
डॉ. मोहन श्रीरंग कांबळे
१२० – १२३

समकालीन शिक्षण व्यवस्थेचा भेदक आलेख : बॉनसाय
प्रा. डॉ. दिलीप भिसे
१२४ – १२७

समकालीन मराठी ग्रामीण साहित्य
प्रा. डॉ. संजय खाडप
१२८ – १३०

'गराडा' : शेतकऱ्यांच्या जीवनातील धगधगते जीवनवास्तव सांगणारी मराठी ग्रामीण कादंबरी
प्रा. डॉ. संगीता दत्ताजी मोरे
१३१ – १३५

समकालीन मराठी कादंबरी
प्रा. महारुद्र जगताप
१३६ – १४१

नंतर आलेले लोक कवितासंग्रहातील समकालीन जाणिवा
प्रा.डॉ. राजकुमार यल्लावाड
१४२– १४८

ग्रामीण कादंबरीतून आविष्कृत झालेले शेतकरी जीवन
स. प्र. ढास रवींद्र बाबासाहेब
१४९ – १५३

साठोत्तरी साहित्य प्रवाह आणि मराठी स्त्रीवाद
प्रा. डॉ. मनोहर सिरसाट
१५४ – १५७

VISHWABHARATI RESEARCH CENTRE
BULLETIN OF INDIAN SOCIETY AND CULTURE
ISSN 2395-3748
Vol 5. Issue 2. Feb 2018. pp. 154 - 157
http://www.vishwabharati.in
Paper received: 01 Jan 2017.
Paper accepted: 25 Feb 2017.
© VISHWABHARATI Research Centre

# साठोत्तरी साहित्य प्रवाह आणि मराठी स्त्रीवाद

प्रा. डॉ. मनोहर सिरसाट

साठोत्तरी साहित्य चळवळी ह्या एकुण मानवी जीवनाच्या परिवर्तनाच्या, बदलाच्या मागणीतून जन्मास आल्याचे दिसते. विषम सामाजिक व्यवस्थेने अनेक प्रश्न निर्माण केले होते. या प्रश्नांमुळे असमाधान आणि असंतोष मोठ्या प्रमाणावर बळकावला होता. या असंतोषावरचे उत्तर म्हणून साहित्य प्रवाहाची चळवळ निर्माण झाली. या चळवळीतून आलेल्या साहित्य प्रवाहामध्ये दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य, मुस्लिम साहित्य, ख्रिस्ती साहित्य यांचा अंतर्भाव होतो. शोषणमुक्त समाजाची निर्मिती आणि समतेची प्रतिष्ठापणा यासाठी म्हणूनच या साहित्य चळवळी उभ्या झाल्या. समाजजीवनातील विसंवाद, असुरक्षितता, अगतिक्ता हे घटक साहित्य चळवळी निर्माण होण्यास सहाय्यभूत ठरले. एक विचार आणि भूमिका घेऊन ह्या साहित्य चळवळी अवतिर्ण झाल्याचे निदर्शनास येते.

फुले – शाहू – आंबेडकरी विचार हे या चळवळीच्या प्रेरणा होत्या. त्यांचा समताधिष्ठित समाज रचनेचा विचार घेऊन या चळवळीच्या साहित्य प्रवाहांनी आपला विचार अधिक प्रवाहित केला. समाजातील स्वत्व आणि सत्व हरविलेल्या समाजाला जागृत करण्याचे काम या चळवळींनी केले. भारतीय समाजात सर्वसामान्य माणूस

प्रा. डॉ. मनोहर सिरसाट : पदवी मराठी विभाग आणि संशोधन केंद्र, कला, वाणिज्य आणि विज्ञान महा. धारुर



हा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय या सर्वच दृष्टींनी अत्यंत हवालदिल झालेला होता. प्रस्थापितांकडून ग्रामीण, दलित, आदिवासी, कामगार यांसारख्यांचेच मोठ्या प्रमाणारचे शोषण होत होते. या शोषक घटकांनी माणसाचे माणूसपण च नाकारले गेले. एकूण शोषण व्यवस्थेचा अतिरेक झाला त्यातून काही सामाजिक चळवळी उभ्या झाल्या. त्यातून साहित्याविषयक जाणिवा अधिक धारदार होऊन आपली अनुभूती शब्दांतून व्यक्ती झाली पाहिजे, आपणच आपले लिहिले पाहिजे, या भूमिकेतून साहित्य चळवळी साहित्य निर्मीतीच्या दिशेने पुढे आल्या.

साठोत्तरी साहित्य प्रवाह हे चळवळीतून आलेले असल्यामुळे त्या प्रवाहांच्या अभिव्यक्तीमध्ये सशक्तता होती. मराठी साहित्य परंपरा आणि एकूणच साहित्य इतिहासाला नवी कलाटणी देण्याचे महत्वपूर्ण काम या साहित्य प्रवाहांनी केले. मराठी साहित्याचा नवा इतिहास निर्माण केला, पारंपारिक साहित्यातील सर्व मर्यादांना मोडीत काढून लोकशाही मूल्यांची पेरणी करण्याचे काम या प्रवाहाने केले. नवा जीवनानुभव, नवी भाषा, नवी शैली घेऊन हे साहित्य आल्यामुळे आजपर्यंत मराठी साहित्यात जो आशय आलेला नव्हता, तो आशय या चळवळीच्या साहित्य प्रवाहातून अत्यंत सकस पध्दतीने आला, हे या प्रवाहाचे वैशिष्ट्ये आहे. चळवळीच्या निर्मीतीची मिमांसा करतांना वसंत आबाजी डहाके म्हणतात की, सत्तामोहामुळे अस्थिर झालेली राजकीय स्थिती, सत्ताकेंद्रावरील भांडवलदार, कारखानदार, बागायतदार यांची पकड, सर्व आणि दलित यांच्यातील वाढत चाललेली दरी, सामाजिक जीवनातील मूल्यन्हास, शिक्षणपध्दती, अभ्यासपुर्ण आणि वास्तविक जीवनातील विलगता, साहित्यातील वास्तवन्मुख कलात्मकता आणि रसवादी, सौंदर्यवादी वा आकृतीवादी समिती या साऱ्या गोष्टींना प्रबळ नकार देण्याची उर्मी या पिढीच्या मनात निर्माण झाली होती. (वाङ्मयीन सज्ञा संकल्पना कोश ! आमुख पृ, ३९) हे सारे १९६० नंतरच्या काळात घडत गेले साठोत्तरी साहित्य प्रवाहासंदर्भात प्रसिध्द लेखक आणि समीक्षक डॉ. नागनाथ कोतापल्ले म्हणतात की, इ.स. १९६० नंतरच्या साहित्य चळवळीचे हे वैशिष्ट्ये आहे की, त्या एकूण जीवनाच्याच परिवर्तनाची मागणी करतात. मजल्यावरी उभी असणारी भिषण व्यवस्था नष्ट

झाली पाहिजे, असे दलित साहित्य चळवळीला वाटते तर सर्व प्रकारच्या शोषणातून ग्रामीण समाज मुक्त झाला पहिजे, असे ग्रामीण साहित्य वळवळीला वाटते. युगानुयुगाच्या पुरुष सत्ताक व्यवस्थेच्या जोखडातून स्त्रीची मुक्ती झाली पाहिजे, असे स्त्रीवादी साहित्य चळवळीला वाटते तसेच संस्कृतीच्या नावाखाली

आणि संस्कृतीच्या अहंकारातून, निसर्गाच्या जवळ राहणाऱ्यांना समजून न घेता त्यांचे शोषण करणारे जे कोणी आहेत त्यांच्या जोखडातून आपली मुक्ती व्हावी असे आदिवासी साहित्य चळवळीला वाटते. (साहित्याचा अन्वयार्थ, पृ ६२) हे सर्व प्रवाह मानवमुक्तीचा एकच विचार घेऊन आले आहेत. याबाबतीत प्रसिध्द नाटककार जयंत पवार म्हणतात, बहुसंख्य परिवर्तनवादी लेख वास्तववाद जवळ करतात, याचे कारण ते इहवादी असतात. माणसाचे भौतिक जगणचं खरं असं ते मानतात. दुःख, शोषण, पिळवणूक आणि मानवी अस्तित्वाचा अर्थ ते ऐहिक सुखाच्या संदर्भातच लावतात. पारलौकिकता, आध्यात्म, गुढता ही त्यांना शोषकांनी मूळ कारणावरून त्यांच लक्ष उडविण्यासाठी केलेली चालबाजी वाटते. म्हणूनच माणूस हेच अंतिम सत्य असं ते मानतात. (खेळ जून २०१३, मुलाखत पृ.६६).

या प्रमाणे साठोत्तही साहित्य प्रवाहांनी त्यांच्या शोषणाच्या विविध रुपांचा त्यामागच्या कारणांचा वेध घेतल्याने लक्षात येते.

खऱ्या अर्थाने विषम मूल्यव्यवस्था हीच मूळात परिवर्तनासाठी पूरक ठरली. समता मुल्यांसाठीचा हा संघर्ष होता. लेखक आणि विचारवंत डॉ. प्रल्हाद लुलेकर स्त्रीवादाच्या निर्मितीचा विचार मांडतांना म्हणतात, स्त्री पुरुष समानतेच्या अपरिहार्यतेतून स्त्रीवादी विचार राजकीय भूमिकेसह चळवळीच्या स्वरूपात मांडला गेला. जवळपास तीनशे वर्षाच्या काळात हा विचार क्रमाने संकमित होत आला आहे. मात्र फ्रेंच राज्यक्रांतीनंतरच स्त्रीवादी चळवळीला गती आणि रुप प्राप्त झाले. स्त्रियांना मिळणाऱ्या दुय्यम स्थानाला, त्यांच्या शोषणाला कारण ठरणाऱ्या पुरुषसत्ताक व्यवस्थेला आव्हाण देणे गरजेचे होते. नवसमाज निर्मीतीसाठी स्त्री अस्मितेचा पुरस्कार करणाऱ्या नवनव्या पर्यायांचा शोध घेण्याची गरज होती. त्यातूनच स्त्रीवादी चळवळीची निर्मीती झाली. (साठोत्तरी साहितय प्रवाह – २, पृ ४७)

भारतीय स्त्रीला सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठेच्या संदर्भात भारतीय समाज व्यवस्थेने दुय्यमत्व दिले होते, तिला अप्रतिष्ठीत केले होते. तिला सर्वच हक्कांपासून वंचित ठेवण्यात आले. माणूस म्हणून समाजव्यवस्थेच्या कोणत्याच क्षेत्रात स्थान नसल्याच्या जाणीवेने जीवनातल्या विविध ताणतणावाचे अस्वस्थ स्त्रीमन संघर्षाला सिध्द झाले हाते. शरीर भेदावर असलेले स्त्री – पुरुष विभाजन अमान्य करीत स्त्रीवादी साहित्य साकार झाले. स्त्री असणे आणि स्त्रीचे असणे ही बाब सामाजिक, सांस्कृतीक, धार्मिक, आर्थीक, राजकीय व्यवस्थेत स्त्रीयांना दुय्यम स्थान देते, आणि शोषण करते. स्त्रीकडे पुरुषत्ताक व्यवस्था ही एक तर स्त्री म्हणजे शारीरीणी, पापी, हडळ, वेश्या आणि दुसरे म्हणजे माता, देवता, शक्ती, तारक या दृष्टीने पाहून त्यांचे शोषण करते. स्त्री माणूस आहे म्हणून तिला समानतेने वागविले पाहिजे ही भावना स्त्रीवादाने प्रबळ केली. स्त्रीकडे सेक्स सिंबॉल म्हणून पाहण्यास स्त्रीवादी साहित्य नकार देते. स्त्रीयांचे अनुभवविश्व हे काळ्या जाणीवेचे आहे. मात्र यानुळे ती दुबळी ठरत नाही. अपत्यनिर्मीती हे तिचे बलस्थान आहे. ही स्त्रीवादी साहित्याची भूमिका आहे. स्त्रीवर स्त्री म्हणून लादल्या गेलेल्या भूमिकांना नकार, स्त्रीत्वाच्या दुय्यमत्वाला नकार, स्त्री पुरुष समानतेचा आग्रह, स्त्री शोषणाविरुध्द विद्रोह, माणूसपणाची भूमिका, स्त्रियांच्या पारंपारिक प्रतिमांना आव्हाण, आपल्या शरीरभेदासह आपले वेगळेपण स्त्रीवादी साहित्याने अधोरेखित केले आहे.



मराठी स्त्रीवादी साहित्यातून बदलत्या सामाजिक परिस्थितीत स्त्रींच्या विविध भूमिका तिच्या भोवतीच्या समस्या, तिच्या समोरील आव्हाने, समूहात राहूनही जगण्यात आलेले एकाकीपण, मानसिक ताणतणाव आणि लैंगिक शोषण, विषमता यांचे चित्रण येतांना दिसते. यामध्ये माधवी देसाई, विभावरी शिरुरकर, पद्मजा फाटक, कमल देसाई, मेघना पेठे, लीला श्रीवास्तव, सरीता पत्की, आसावरी काकडे, आश्विनी घोंडगे, मंगला वरखेडे, मल्लिका अमर शेख, अंजली पेंडसे, विमल लिमये, प्रिया तेंडुलकर, गौरी देशपांडे, आशा बगे, सानिया निरजा, उर्मिला पवार, संध्या रंगारी, प्रतिभा अहिरे, यासह अनेक लेखिका कवयित्री आपल्या लेखनातून स्त्रीवादाच्या सशक्त आशय आविष्कृत करीत आहेत. म.फुले, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी भूमिकेतून मराठी साहित्यातील स्त्रीवाद अधिक प्रगल्भ होत गेला. माणूस केंद्रवर्ती मानून स्त्रिवादाची मिमांसा प्रामुख्याने होऊ लागली, हा मराठी स्त्रीवादाचा महत्वाचा विषय होय. यापुढेही स्त्रीवाद अधिक परिपक्वतेकडे जाईल, हे स्पष्टपणे लक्षात येते.

संदर्भ सूची :

१) डॉ. नागनाथ कोतापल्ले – साहित्याचा अन्वयार्थ

२) वसंत आबाजी डहाके – वाङ्मयीन सं–II संकल्पना कोश

३) जयंत पवार – खेळ, मुलाखत जून २०१३

४) डॉ. प्रल्हाद लुलेकर – साठोत्तरी साहित्य प्रवाह